क्रमांक: जमीन-२५९४/११११/प्र.क्र.५०९७/ज-३
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक: ४ / ६ /१९९४

विषय:- जमीन : मुंबई उपनगर जिल्हा
मौजे कांदिवली स.नं. १४२ पै
केबल टर्मिनल स्ट्रक्चरसाठी जमीन मिळणेची
विनंती
टाटा पॉवर कंपनी यांची विनंती.

ज्ञापन:-

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा मुंबई यांना त्यांच्या क्रमांक: कार्या-३-डी/कावि-८०२/९३, दिनांक १४.१.१९९४ च्या पत्रास अनुलक्षून विज्ञप्तीपूर्वक कळविण्यात येते की, मे.टाटा हायड्रो इलेक्ट्रीक पॉवर सप्लाय कंपनी यांना मौजे कांदिवली येथील स.नं. १४२ पै. मधील २१६ चौ.मी. केबल टर्मिनल करिता आणि २७४/चौ.मी. रस्त्याकरिता अशी एकूण ४९० चौ.मी. जमीन महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीचे वितरण) नियम १९७१ मधील नियम ३१ मधील तरतुदीनुसार सदर जमिनीच्या प्रति चौ.मी.ला रु. ४००/- इतक्या तात्पुरत्या किंमतीप्रमाणे, त्या किंमतीच्या १५टक्के इतके भाडे आकारून १० वर्षांच्या कालावधीसाठी भाडेपट्ट्याने पुढील अतिरिक्त अटीवर देण्यास शासनाने मंजूरी दिली आहे.

अट:- मे.टाटा हायड्रो इलेक्ट्रीक पॉवर सप्लाय कंपनीने तात्पुरती भाडेपट्ट्याची रक्कम व शासन अंतिमरित्या ठरविल त्या दराने भाड्याची रक्कम या मधील फरकाची रक्कम विहित व्याजासह वसूल करावी हे कंपनीस मान्य असल्याचे हमीपत्र मुद्रांकित पत्रावर लिहून द्यावे.

२. सोबत प्रकरणाची १ संचिका परत करण्यात येत आहे.

३. हे ज्ञापन नगर विकास विभागाच्या सहमतीने आणि वित्त विभागाने या विभागास क्र. विअप्र-१०९२/प्र.क्र.१४८/९२/विनियम,

....२/-

OFFICE OF THE COLLECTOR BAY SUBURBAN DIST. 10/6/94

दिनांक ३.८.९२ अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[कि. वि. आव्हाड]
कार्यासन अधिकारी,
महसूल व वन विभाग

प्रति,

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा,
को. एम. आर. डी. ए. इमारत,
बान्द्रे (पू.) मुंबई-४०००५१

प्रतिलिपी :-

१) आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई
२) सहायक संचालक, भूमी अभिलेख कोकण प्रदेश, नवी मुंबई
३) सहायक संचालक नगर रचना, मुंबई
४) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
५) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
६) निवड नस्ती ज-३ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.

Scanned by CamScanner

क्र. ६२/बही/एल- ५६८
जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय, बी. एम. आर. डी. ए. इमारत, ३रा मजला, बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१

दिनांक :- २९ .७.९४

वाचा :- १) शासन ज्ञापन क्र.जमिन-२६९४/१११/प्र.क्र.५०९७/ज-३, दिनांक ४.६.९४.

<u>आदेश</u>

मे. टाटा हायड्रो इलेक्ट्रीक पॉवर सप्लाय कंपनी यांना मौजे-कांदिवली येथील स.नं. १५९ पै. मधील २१६ चौ.मि. केबल टर्मिनल करिता आणि २७४ चौ.मि. रस्त्याकरिता असे एकूण ४९० चौ.मि. जमिन महाराष्ट्र जमिन महसुल (सरकारी जमिनीचे वितरण) नियम १९७१ मधील नियम ३५ मधील तरतुदीनुसार सदर जमिनीची प्रती चौ.मि.ला रु. ४००/- प्रमाणे तात्पुरत्या किंमतीप्रमाणे त्या किंमतीच्या १५ टक्के इतके भाडे आकारुन <u>१० वर्षाच्या कालावधीसाठी</u> भाडेपट्टयाने पुढील अतिरिक्त अटीवर देण्यात मंजुरी देण्यात येत आहे.

१) पट्टेदार कंपनीने जमिनीची तात्पुरत्या प्रति चौ.मि. रु. ४००/- प्रमाणे होणाऱ्या किंमतीच्या १५ टक्के दराने निश्चित केलेली तात्पुरती वार्षिक भाडेपट्टयाची रक्कम रु. ~~२९,४००/-~~ 30003/- तहसिलदार बोरीवली यांचे कार्यालयात आगाऊ भरणा करावी.

२) मे. टाटा हायड्रो इलेक्ट्रीक पॉवर सप्लाय कंपनीने तात्पुरती भाडेपट्टयाची रक्कम व शासन अंतिमरित्या ठरविल त्या दराने भाड्याची रक्कम त्यामधील फरकाची रक्कम विहित व्याजासह भरण्यास तयार असल्याचे हमीपत्र मुद्रांकित पेपरवर लिहून द्यावे.

३) मे. टाटा हायड्रो इलेक्ट्रीक पॉवर सप्लाय कंपनीने सदर जमिनीचा वापर ज्या कारणासाठी जमिन दिली आहे त्याच कारणासाठी करावा.

४) प्रश्नाधिन जमिन किंवा तीचा कोणताही भाग शासनाचे लेखी पूर्व संमत्तीशिवाय विक्री भोगवटा वा गहाण टाकू नये.

५) शासनाच्या किंवा कोणत्याही शासनाच्या अखत्यारीतील स्थानिक प्राधिकरणाच्या सार्वजनिक प्रयोजनाकरिता प्रश्नाधिन जमिनीची आवश्यकता भासल्यास त्याबाबतीत जिल्हाधिकारी भाडेपट्टेधारकास एका महिन्याची लेखी नोटीस देऊन हा भाडेपट्टा कोणत्याही वेळी रद्द करण्यात येईल.

६) उक्त भाडेपट्टा समाप्त झाल्याबद्दल पट्टेदाराला कोणत्याही भरपाई दाखल दावा सांगण्याचा अधिकार असणार नाही व जमिनीचा ताबा ज्या स्थितीत होता त्या स्थितीत त्याचा कब्जा तो जिल्हाधिकारी यांचे कडे स्वाधिन करावा लागेल.

कृ.मा.प.

७] सदरच्या जमिनीचा करारनामा करण्यासाठी कंपनीला बोलविण्यात येईल त्यावेळी कंपनीला शासनाबरोबर विहीत नमुन्यात [नमुना ११] करारनामा करणे आवश्यक राहील.

८] उक्त अटी व शर्तींचा भंग झाल्याचे निदर्शनास आल्यास सदरहू भाडेपट्टा रद्द झाल्याचे समजण्यात येऊन जमिन सरकार जमा करण्यात येईल.

प्रस्तावित जमिनीचा ताबा कंपनीने नगर भूमापन अधिकारी क्र. ६, रखीया मॅन्शन, एस.व्ही.रोड, जोगेश्वरी, मुंबई-४०००६० यांचेकडून घ्यावा. तत्पूर्वी तात्पुरती वार्षिक भाडेपट्ट्याची रक्कम रु. ~~[illegible]~~ 30,005/- तहसिलदार बोरीवली यांचेकडे प्रथम भरणा करावी. तसेच हमीपत्रही सादर करावे.

Ok

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा

प्रति,

उप मुख्य मालमत्ता अधिकारी,
धारावी रिसिव्हींग स्टेशन,
शालीमार इंडस्ट्रीयल इस्टेटचे बाजूला,
माटुंगा, मुंबई-४०००१९

प्रत :- नगर भूमापन अधिकारी क्र. ६, रखीया मॅन्शन, एस.व्ही.रोड, जोगेश्वरी, मुंबई-४०००६० यांचेकडे जरूर त्या कार्यवाहीकरीता रवाना.

२/- त्यांनी पट्टेधारक कंपनीने हमीपत्र सादर केल्यानंतर तसेच भाडेपट्ट्याची रक्कम भरणा केल्याची प्रथम खात्री करावी व त्यानंतर सोबत जोडलेल्या नकाशात दर्शविण्यात आलेल्या भूखंडाची २२६ चौ.मि. व २९४ चौ.मि. क्षेत्रफळाचे दोन भूखंड म्हणजेच एकूण ५२० चौ.मि. जमिनीचा ताबा मे. टाटा हायड्रो इलेक्ट्रीक पॉवर सप्लाय कंपनीला देऊन ताबा पावतीच्या नकाशाच्या तीन/तीन प्रतीसह पुढील अहवाल या कार्यालयाकडे सादर करावा. तसेच मिळकत पत्रिकेत जरूर त्या नोंदी घेऊन त्याच्या प्रती सादर कराव्यात.

प्रत :- तहसिलदार बोरीवली यांचेकडे भाडेपट्टा रकमेच्या वसुलीसाठी रवाना.

Ok

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा करिता

सायोएस/१८७२४.

क्र. ६२/७डी/एल ५६४
जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय
बी. एस. आर. डी. ए. इमारत, ३रा मजला, वांद्रे (पूर्व)
मुंबई ४०० ०५१.

दिनांक - 8/9/94

वाचा- १. शासन ज्ञापन क्र. जमीन २६९४/१११/प्र.क्र. ५०९७/ज-३ दिनांक ४.६.९४

२. या कार्यालयाचा आदेश क्र. ६२/७डी/एल ५६४/दिनांक १९.७.९४

३. टाटा हायड्रो इलेक्ट्रीक पॉवर सप्लाय कंपनी लि. यांचे पत्र क्र. बीपी/२८०/१२१६ दिनांक ३.८.९४

## शुध्दीपत्रक

उपरोनिर्देशित क्र. २ मधील आदेश क्र. ६२/७डी/एल ५६४/दिनांक १९.७.९४ मधील पहिल्या परिच्छेदमधील पहिली दुसरी व तीसरी ओळ खालील प्रमाणे वाचण्यात यावी.

"मे. टाटा हायड्रो इलेक्ट्रीक पॉवर सप्लाय कंपनी यांना मौजे कांदिवली येथील स.नं. १४९ पै. मधील ३५२ चौ.मी. केबल टर्मिनल करिता आणि १३८ चौ.मी. रस्त्याकरिता असे एकूण ४९० चौ.मी जमीन"

स्वाक्षरीवर जिल्हाधिकारी यांची सही असे

जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हा.

प्रति,
उप मुख्य मालमत्ता अधिकारी
धारावी रिसिव्हींग स्टेशन
शालीमार इंडस्ट्रीयल इस्टेट चे बाजूला,
माटुंगा, मुंबई ४०० ०१९.

प्रत- नगर भूमापन अधिकारी क्र. ६ रहीया मंझील एस.व्ही. रोड, जोगेश्वरी मुंबई ४०० ०६०. यांचेकडे माहितीसाठी रवाना.

प्रत- तहसिलदार बोरीवली यांचेकडे माहितीसाठी रवाना.

Issued

जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हाकरिता

Scanned by CamScanner

W-302

क्रमांक: जमीन-२६९४/३३३१/प्र.क्र.४०२७/ज-३
महसूल व वन विभाग
मंत्रालय, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक:- २४ ऑगस्ट, १९९८.

विषय:- **जमीन - मुंबई उपनगर जिल्हा**
मौ. कांदिवली स.नं. १५२ पै
केबल टर्मिनल स्टेशनसाठी जमीन
मिळणेबाबत विनंती.
टाटा पॉवर कंपनी यांची विनंती.

**शुद्धिपत्रक**

शासन ज्ञापन क्रमांक दिनांक ४.८.१९९४ मधील परिच्छेद - १ मधील ओळ क्र. ४ व ५ मधील "स.नं. १५२ पै मधील २१६ चौ.मी. केबल टर्मिनल करिता आणि २०४ चौ.मी. रस्त्याकरिता अशी एकूण ४२० चौ.मी." ऐवजी " स.नं. १५२ पै मधील २७८ चौ.मी. केबल टर्मिनल करिता आणि १५१.२ चौ.मी. रस्त्याकरिता अशी एकूण ४२९.२ चौ.मी. " असे वाचावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ द. जि. फाटक ]
कक्ष अधिकारी
महसूल व वन विभाग.

जिल्हाधिकारी मुंबई
उपनगर जिल्हा यांचे कार्यालय
दिनांक 01 AUG 1998
आवक क्र.:-
शी.क्र. 17930
VII-8
लिपीक — जिल्हाधिकारी

प्रति,
जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा
एस.एस.आर.डी.ए. इमारत
वांद्रे (पूर्व), मुंबई:- ४०० ०५१.

प्रतिलिपी:-
१) आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई यांना.
२) सहाय्यक संचालक, भूमी अभिलेख, कोकण प्रदेश, नवी मुंबई.
३) सहाय्यक संचालक, नगर रचना, मुंबई.
४) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) निवडनस्ती ज-३ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.

Scanned by CamScanner

क्र.:६२/अडी/एल-५६४ कांदिवली

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा,
एम.एम.आर.डी.ए. इमारत, तळ मजला,
बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.

दिनांक :- ०७/०३/२०००

वाचावे :
१] जिल्हाधिकारी, मुं.उ.जि. आदेश क्र.६२/अडी/एल-५६४, दि.१९.७.१९९४
२] जिल्हाधिकारी, मुं.उ.जि. शुध्दीपत्रक आदेश क्र.६२/अडी/एल-५६४, दिनांक ८.७.१९९४
३] नगर भूमापन अधिकारी [६] यांचेकडील पत्र क्र.नभूअ-६/मोजणी-७८८/९५, कांदिवली, दिनांक २७.१२.१९९५
४] शासन, महसूल व वन विभाग शुध्दीपत्रक क्र.जमीन-३९९४/१११२/प्र.क्र.२०२३/ल-३, दिनांक २५.८.१९९८.

---

<u>शुध्दी आदेश</u>

मे.टाटा हायड्रो इलेक्ट्रीक पॉवर सप्लाय कंपनीस मौजे कांदिवली, तालुका बोरीवली येथील केबल टर्मिनल व रस्त्याकरीता स.नं.१५९ पै या जागेतील एकूण क्षेत्र ५५०चौ.मी. जमीन भाडेपट्टा तत्वावर ३० वर्षे मुदतीसाठी उद्देशिकेतील क्र.१ मधील आदेशान्वये प्रदान करण्यात आलेली होती. परंतु प्रत्यक्ष मोजणीअंती नगर भूमापन अधिकारी क्र.६ यांनी एकूण क्षेत्र ५२७.२ चौ.मी. जमीनीचा ताबा दिलेला आहे. त्या प्रमाणे उद्देशिकेतील क्र.४ मधील आदेशानुसार ३७८चौ.मी. केबल टर्मिनल आणि १४९.२ चौ.मी. [illegible] मिळून एकूण ५२७.२ चौ.मी. यांना मंजुरी दिलेली आहे. त्यामुळे पट्टेदार कंपनीने वाढीव क्षेत्र ३७.२ चौ.मी. क्षेत्रावर भाडेपट्टा भरणे जरुरीचे आहे.

भाडेपट्टेदार कंपनीने जमीनीची तात्पुरता प्रती चौ.मी. रु.४००/- प्रमाणे होणाऱ्या [क्षेत्र ३७.२ चौ.मी.] किंमतीच्या १५% दराने निश्चित केलेली तात्पुरती वार्षिक भाडेपट्ट्याची रक्कम रु.२,४५६.४० तहसिलदार बोरीवली यांचे कार्यालयात आगाऊ भरणा करावी. कोष दरवर्षी [तेहतीस हजार एकशे बासष्ट मात्र]रु.३३,१६२/- प्रमाणे तहसिलदार बोरीवली यांचेकडे भरणा करावा.

भाडेपट्टेदार यांना उद्देशिकेतील क्र.१ च्या आदेशातील सर्व अटी बंधनकारक राहतील.

~~सही/-~~
जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा.

स्वाक्ष प्रतीवर जिल्हाधिकारी यांची सही आहे.

प्रति,
मे मुख्य मालमत्ता अधिकारी,

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
**विभागीय आयुक्त कोकण विभाग यांचे कार्यालय**
**कोकण भवन पहिला मजला, सी.बी.डी बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.**
फोन: ०२२-२७५७१५१७, ०२२-२७५७८००३ ❖ फॅक्स क्र. : ०२२-२७५७१५१६
❖ ई मेल : rbkonkan@gmail.com ❖ konkandcr@gmail.com

क्र. मशा/कार्या २/ज ३/कावि-३६७/२०१५ दि. १४/१०/२०१५

15 OCT 2015

प्रति,
जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा

विषय:- जमीन : मुंबई उपनगर जिल्हा
मौजे-कांदीवली ता.बोरीवली स.नं.१४९ पै.न.भू.क्र.१अ पै.मधील केबल टर्मिनल व रस्ता या प्रयोजनाकरीता भाडेपट्टयाने प्रदान केलेल्या जमिनीच्या भाडेपट्टयाचे रुपांतर कब्जेहक्काने भोगवटादार वर्ग-२ या सत्ताप्रकारात करणेबाबत
दि टाटा पॉवर कं.लि.ने केलेली विनंती

संदर्भ: आपले पत्र क्र.सी/कार्या-३डी/एल-५६४/२०१४/६२२ दि.१८/१२/१४
व पत्र एल-५६४/२०८ जा.क्र.३७२४ दि.३०/५/२०१५

आपण सादर केलेल्या संदर्भाधीन अहवालावरुन असे दिसते की, शासन, महसूल व वन विभागाकडील ज्ञापन क्र.जमीन-२६९४/१११२/प्र.क्र.५०९७/ज-३ दि.६/४/१९९४ शुध्दीपत्रक क्र.जमीन-२६९४/१११२/प्र.क्र.५०९७/ज-३ दि.२५/८/१९९८ तथा आपले आदेश क्र.६२/३डी/एल-५६४ दि.१९/७/९४ व शुध्दीपत्रक क्र.६२/ ३डी/ एल-५६४ दि.८/९/१९९४ अन्वये मौजे-कांदिवली येथील स.नं.१४९ पैकी, न.भू.क्र.१कर/१ पैकी ३७८ चौ.मी.जमीन मे.टाटा हायड्रोइलेक्ट्रीक पॉवर सप्लाय कंपनीस केबल टर्मिनल करीता व १५१.२ चौ.मी.जमीन रस्त्याकरीता अशी एकुण ५२९.२ चौ.मी.जमीन 10 वर्षाच्या मुदतीकरीता भाडेपट्टयाने मंजूर करण्यात आलेली आहे. जमीनीचा ताबा कंपनीस ७/८/१९९५ रोजी देण्यात आलेला आहे. भाडेपट्टयाची मुदत दि.६/८/२००५ रोजी संपुष्टात आलेली आहे. ( आपल्या अहवालात चुकून भाडेपट्टयाची मुदत दि.६/८/२००६ रोजी संपुष्टात आल्याचे नमूद केले आहे)

आपण दि.३/१०/२००७ च्या पत्राने कंपनीने कोणत्याही प्रकारचा शर्तभंग न केल्याने व थकीत भाडेपट्टयाची रक्कम व्याजासह भरणा केल्यामुळे भाडेपट्टयाची मुदत १० वर्षांनी वाढवून देण्यासंदर्भात शासनास अहवाल सादर केला होता. दरम्यान शासन महसूल व वन विभागाकडील निर्णय क्र.जमीन २५०५/प्र.क्र.४०५/ज-२ दि.१२/१२/२०१२ च्या अनुषंगाने आपण दि.३०/३/२०१३ च्या पत्राने भाडेपट्टेदार कंपनी भाडेपट्टयाने धारण करत असलेली जमीन कब्जेहक्काने भोगवटादार वर्ग-२ या सत्ताप्रकारात रुपांतरित करून घेण्यास तयार आहेत का? याची विचारणा केली असता कंपनीने त्यांच्या दि.२६/१०/२०१३ च्या पत्राने जमीन भोगवटादार वर्ग-२ म्हणून कब्जेहक्काने धारण करण्याचा विकल्प स्विकारण्यास तयार असल्याचे आपणास



Scanned by CamScanner

कळविले. मात्र आपल्या दि.३०/३/२०१३ च्या पत्राने रुपांतरीत शुल्काची रक्कम वाणिज्यिक प्रयोजनावर आधारीत आकारल्याने कंपनीने विज उत्पादन, वितरण व त्याचे पारेषण ही औद्योगिक बाब असल्यामुळे रुपांतरीत शुल्काची रक्कम औद्योगिक प्रयोजनावर आकारण्याची विनंती केली. विकल्प स्विकारण्यासंदर्भात त्यांनी विहीत नमुना "ब" व "क" मध्ये आपणाकडे शपथपत्रही दाखल केले आहे. आपल्या स्तरावर सुनावणी घेऊन कंपनीची बाजू ऐकून घेण्यात आली व कंपनीचा प्रकल्प औद्योगिक प्रयोजनात मोडत असल्याची खात्री करुन त्या अनुषंगाने कब्जेहक्काच्या विकल्प करीता आकारण्यात आलेले रुपांतरीत शुल्क वाणिज्य वापराऐवजी औद्योगिक वापराकरीता आकारण्याचे निर्देश आपले दि.१७/१२/२०१४ च्या आदेशाने देण्यात आले.

आपण प्रश्नाधिन ५२९.२ चौ.मी.क्षेत्राकरीता सन २०१३ चा बाजारभाव रक्कम रु.४०१००/- प्रती चौ.मी.दराने येणारी एकुण रक्कम रु.२,१२,२०,९२०/- च्या २५% रक्कम रु.५३,०५,२३०/- इतके औद्योगिक वापराकरीता रुपांतरीत शुल्क, जमीन कब्जेहक्काने भोगवटादर वर्ग-२ या सत्ताप्रकाराने धारण करण्याकरीता आकारले आहे.

शासन, महसूल व वन विभाग निर्णय दि.१२/१२/२०१२ मधील परिच्छेद क्र.4 (अ)(६) नुसार भाडेपट्टेधारकाचा, जमीन कब्जेहक्काने भोगवटादार वर्ग-२ सत्ता प्रकाराने धारण करण्याचा विकल्प ज्या दिवशी प्राप्त होईल, त्या दिवसापर्यंतची भुईभाडयाची आकारणी करुन त्याची वसुली झाल्यानंतरच रुपांतरणाचे आदेश जिल्हाधिकाऱ्यानी विभागीय आयुक्त कोकण विभाग यांच्या पूर्व मान्यतेने पारीत करावयाचे आहेत. परिच्छेद क्र.४(अ)(५) मधील शासनाच्या निर्देशाप्रमाणे जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी भाडेपट्ट्यानी धारण केलेल्या जमिनी कब्जेहक्काने भोगवटदार वर्ग-२ सत्ता प्रकाराने नियमीत अटी व शर्तीसह रुपांतरीत करण्याच्या आदेशाचा मसुदा, महाराष्ट्र जमीन महसूल संहीता, १९६६ मधील तरतुदी तसेच या संहीतेअंतर्गत तयार करण्यात आलेल्या नियमांच्या तरतुदी, त्याचप्रमाणे भोगवटदार वर्ग-२ सत्ता प्रकाराच्या जमीन संदर्भात प्रचलित धोरणे / शासन निर्णय / स्थायी आदेशातील तरतुदी विचारात घेऊन तसेच मूळ भाडेपट्टयातील अटी व शर्ती विचारात घेऊन तयार केला असल्याची व तो आपणांस पाठविला असल्याची धारणा आहे. तरी शासन निर्णय दि.१२/१२/२०१२ मधील तरतुदीनुसार अर्जदार कंपनीकडून देय होणारी रक्कम वसूल करुन प्रश्नाधिन जमीन भोगवटदार वर्ग-२ म्हणून अर्जदार कंपनीस विहीत करण्यात आलेल्या आदेश मसुद्यानुसार मंजूर करण्याबाबत आपल्या स्तरावर कार्यवाही करावी. तसेच परिच्छेद क्र.4(अ)(७) मधील तरतुदीनुसार जमिनीवर वेळोवेळी प्रचलित असलेल्या दराने अकृषिक आकारणी करुन ती रक्कम दरवर्षी वसूल करावी.

**स्थळप्रतीवर मा.विभागीय आयुक्त यांची सही असे**

(भाऊसाहिब दांगडे)
उपायुक्त (महसूल) कोकण विभाग

Scanned by CamScanner

# जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा

क्रमांक : सी/कार्या-३डी/कब्जे-वर्ग-II/एल-५६४/२०१६/३९४
दिनांक : 18 MAY 2016

वाचले : १) शासन, महसूल व वन विभाग यांचेकडील ज्ञापन क्र.जमीन-२६९४/११११/प्र.क्र.५०९७/ज-३ दि.१४/०६/१९९४ व दि.२५/०८/१९९८.

२) इकडील कार्यालयीन आदेश क्र.६२/३डी/एल-५६४ दि.१९/०७/१९९४, ०८/०९/१९९४ व ०४/०३/१९९९.

३) शासन, महसूल व वन विभागाकडील शासन निर्णय क्र.जमिन २५०५/ प्र.क्र.४०५/ज-२. दि.१२/१२/२०१२.

४) इकडील कार्यालयीन पत्र क्र.सी/कार्या-३डी/ भाडेपट्टा नुतनीकरण/ कब्जेहक्क विकल्प/ एल-५६४/२०१३, दि. ३०/०३/२०१३

५) मा. विभागीय आयुक्त, कोंकण विभाग यांचेकडील पत्र क्र.मशा/कार्या-२/जमिन-३/ काविं३६७/ २०१५, दि.१५/५/२०१५

**आदेश**

मौजे कांदिवली तालुका बोरीवली येथील स.नं.१४९पै. न.भू.क्र. अ पै. मधील ५२९.२० चौ.मी. जमीन शासन आदेश क्र.जमीन-२६९४/११११/प्र.क्र.५०९७/ज-३ दि.०४/०६/१९९४ व २५/०८/१९९८ तदनुषंगाने या कार्यालयाने आदेश क्र.६२/३डी/एल-५६४ दि.१९/०७/१९९४ व ८/९/१९९४ अन्वये टाटा हायड्रो इलेक्ट्रीक सप्लाय कं. यांना ३७८ चौ.मी. केबल टर्मिनल व १५१.२ चौ.मी. रस्ताकरीता असे एकूण ५२९.२० चौ.मी. क्षेत्र दि.०७/०८/१९९५ पासून १० वर्षाच्या मुदतीकरीता भाडेपट्ट्याने प्रदान करणेंत आलेले असून, भाडेपट्ट्याची मुदत दि.०६/०८/२००६ रोजी संपुष्टात आली आहे.

प्रकरणी भाडेपट्टा संपुष्टात आलेल्या प्रकरणांत शासन निर्णय दि. १२/१२/२०१२ नुसार कार्यवाही करणेचे असल्याने, भाडेपट्टेदार कंपनीस इकडील संदर्भांकीत क्र.४ रोजीच्या पत्रान्वये भाडेपट्टा जमिनीच्या भाडेपट्ट्याचे रुपांतर कब्जेहक्काने भोगवटादार वर्ग-२ मध्ये अथवा भाडेपट्ट्याचे नुतनीकरण करणेचा विकल्प देण्यात आला होता. त्यावर संस्थेने त्यांचेकडील दि.२४/५/२०१३ रोजीच्या पत्रान्वये सदरची जमिन कब्जेहक्काने भोगवटादार वर्ग-२ मध्ये रुपांतरीत करून मिळणेचा विकल्प दिला होता. सदरच्या विकल्पाच्या अनुषंगाने संस्थेचा भाडेपट्ट्याने प्रदान केलेली जमीन कब्जेहक्काने भोगवटादार वर्ग-२ मध्ये रुपांतरीत करून मिळणेबाबत शासन निर्णय दि.१२/१२/२०१२ मधील तरतुदीची पुर्तता करुन प्रस्ताव इकडील दि. १८/१२/२०१४ रोजीच्या पत्रान्वये मा. विभागीय आयुक्त, कोंकण विभाग यांना सादर करण्यात आला होता.

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचे कार्यालय, प्रशासकीय इमारत 10 वा मजला, शासकीय वसाहत, बांद्रा (पूर्व), मुंबई 51.
कार्यालय ९१-२६५५६७९९/२६५५७८०७ फॅक्स २६५५६८०५ इमेल mumbaisuburbancollector@mah.gov.in

Scanned by CamScanner

ज्या अर्थी मा. विभागीय आयुक्त, कोंकण विभाग यांनी त्यांचेकडील क्र.मशा/कार्या-२/ज-३/कावि-३६७/२०१५ दि. १५/१०/२०१५ रोजीच्या पत्रान्वये मे.टाटा पॉवर हायड्रोइलेक्ट्रीक पॉवर सप्लाय कंपनी, सध्याची दि.टाटा पॉवर कंपनी लि. यांना प्रदान करणेत आलेली मौजे कांदिवली, ता.बोरीवली स.नं. १४९पै, न.भू.क्र.१ अपै मधील ५२९.२ चौ.मी. भाडेपट्टयाने प्रदान केलेली जमिन शासन निर्णय दि. १२/१२/२०१२ नुसार कब्जेहक्क भोगवटा वर्ग-२ या विकल्पाकरीता सन २०१३ चे बाजारभावानुसार आकारण्यात आलेल्या एकूण किमतीच्या २५% इतकी रुपांतर शुल्काची रक्कम रु.५३,०५,२३०/- वसुल करुन ती जमीन औद्योगिक प्रयोजनाकरीता कब्जेहक्क भोगवटदार वर्ग-२ या धारणाधिकारात धारण करणेस त्यामधील नमूद अटी/शर्तीस, मूळ जमिन प्रदान आदेशातील अटी/शर्तीस व जिल्हाधिकारी ठरवतील अशा अटी/शर्तीस अधिन राहून मान्यता दिली आहे. त्यानुसार दि.टाटा पॉवर कंपनी लि. यांनी कब्जेहक्क भोगवटा वर्ग -२ करीता रुपांतर शुल्काची रक्कम रु. ५३,०५,२३०/- शासन जमा केली आहे.

त्या अर्थी मा. विभागीय आयुक्त, कोंकण विभाग यांचेकडील क्र.मशा/कार्या-२/ज-३/कावि-३६७/२०१५ दि. १५/१०/२०१५ पत्रास अधिन राहून, मी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर मौजे. कांदीवली, ता.बोरीवली येथील स.नं. १४९पै, न.भू.क्र.१ अपै मधील ५२९.२ चौ.मी. जमीन मे.टाटा पॉवर हायड्रोइलेक्ट्रीक पॉवर सप्लाय कंपनी, सध्याची दि.टाटा पॉवर कंपनी लि. यांना औद्योगिक प्रयोजनाकरीता भाडेपट्टयाने प्रदान केलेली जमिन कब्जेहक्काने भोगवटादार वर्ग-२ या सत्ता प्रकारात धारण करणेस खालील अटी/शर्तीवर मान्यता देत आहे.

**अटी व शर्ती :-**

१) सदर कब्जेहक्काने वर्ग-२ या सत्ता प्रकारात धारण करणेस परवानगी दिलेली जमिन अथवा तिचा कोणताही भाग शासनाच्या पूर्व परवानगी शिवाय कोणासही हस्तांतर अथवा विकसित करता येणार नाही.

२) ज्या प्रयोजना करीता जमिन मंजूर करण्यात आली आहे त्या प्रयोजना शिवाय इतर कोणत्याही प्रयोजनार्थ विषयांकीत जमिनीचा वापर कंपनीस करता येणार नाही. तथापि, तशी बाब दिसून आल्यास जमिन त्यावरील बांधकामासह कोणतीही नुकसान भरपाई न देता शासनजमा करण्याची कारवाई करण्यात येईल.

३) उक्त जमिन ज्या प्रयोजनार्थ मंजूर करण्यात आली आहे, त्या प्रयोजनामध्ये काही बदल अथवा जमिनीचा पुनर्विकास करावायाचा झाल्यास, त्यास शासनाची रितसर पुर्वपरवानगी घेणे बंधनकारक राहील व त्याकरीता आकारण्यात येणारे अधिमुल्य शासनास अदा करणे बंधनकारक राहील.



Scanned by CamScanner

४) सदरच्या जमिनीवर बांधण्यात आलेल्या बांधकामात काही फेरबदल अथवा दुरुस्ती करावयाची झाल्यास, त्याकरीता या कार्यालयाची रितसर पुर्वपरवानगी घेणे आवश्यक राहील.

५) सदर कब्जेहक्काने मंजूर केलेली जमीन अथवा त्यावरील कोणताही भाग गहाण/ तारण ठेवणेपूर्वी त्यास शासनाची/ जिल्हाधिकारी यांची पुर्वपरवानगी घेणे बंधनकारक राहील.

६) संस्थेस भाडेपट्ट्याने प्रदान केलेली जमिन कब्जेहक्काने भोगवटादार वर्ग-२ या सत्ता प्रकारात धारण करणेस मान्यता दिलेली असल्याने, यापुढे संस्थेस वार्षिक भाडेपट्ट्याची रक्कम भरणा करणेची आवश्यकता नसून, संस्थेने यापुढे सदर कब्जेहक्काने धारण करणेस मान्यता दिलेल्या जमिनीची अकृषिक साऱ्याची आकारणी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचे कार्यालयात स्वतंत्र अर्ज करुन घ्यावी व येणारा वार्षिक सारा शासनास भरावा.

७) सदरच्या आदेशान्वये आकारण्यात आलेल्या रुपांतर शुल्काचे रक्कमेमध्ये कांही त्रुटी राहून गेली किंवा रक्कम कमी आकारली गेली असल्याचे निदर्शनास आल्यास, त्यामध्ये सुधारीत आकारणी करणेत येईल व येणारी फरकाची रक्कम व्याजासह कंपनीस शासन तिजोरीत भरणा करणे बंधनकारक राहील.

८) सदरची भाडेपट्टा जमिन आता कब्जेहक्काने भोगवटादार वर्ग-२ मध्ये रूपांतरीत करणेस मंजूरी मिळाली असल्याने, त्याबाबत कंपनीला शासन/ जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचे समवेत नव्याने करारनामा करुन तो नोंदणीकृत करुन घ्यावा लागेल.

९) सदर जमीन कब्जेहक्काने मंजूर करण्यात आली असली तरी संस्थेवर मूळ जमीन प्रदान आदेशातील अटी/शर्ती लागू राहतील.

१०) कंपनी शासन /जिल्हाधिका-यांकडून प्राधिकृत करण्यांत येईल अशा सरकारी अधिकारी/कर्मचारी यांना सर्व वाजवी वेळात मंजुर जमिनीच्या कोणत्याही भागात प्रवेश करुन त्याचे निरिक्षण करण्यास परवानगी देईल.

११) भविष्य काळात शासनास सदरची जमीन किंवा तिचा कोणताही भाग कोणत्याही सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक पाहिजे असल्यास सदर जमीन विनातक्रार शासनास परत करणे कंपनीस बंधनकारक राहील.

१२) भविष्यात शासन /जिल्हाधिकारी यांना योग्य वाटतील अशा अतिरिक्त अटी व शर्तीचा समावेश करण्याचा हक्क राखून ठेवणेत येत आहे. सदरच्या अटी व शर्ती कंपनीस बंधनकारक राहतील.



Scanned by CamScanner

१३) कंपनीने सदर आदेशातील कोणत्याही अटीचा / शर्तीचा भंग केल्यास सदर जमीन शासन जमा करण्यांत येईल व त्याकरीता अर्जदारास कोणताही मोबदला देण्यात देणार नाही.

१४) वरील अटी/शर्ती मान्य असलेबाबतचे हमीपत्र रक्कम रू. २२०/- च्या मुद्रांक पेपरवर या कार्यालयात सादर करावे.

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर

प्रति,

मुख्य मिळकत व्यवस्थापक,
मे.टाटा पॉवर हायड्रोइलेक्ट्रीक पॉवर सप्लाय कंपनी,
सध्याची दि.टाटा पॉवर कंपनी लि.,
धारावी रिसिव्हींग स्टेशन, माटुंगा,
मुंबई – ४०० ०१९

प्रत : १) तहसीलदार बोरीवली यांजकडे माहिती करीता रवाना.
२) नगर भूमापन अधिकारी, बोरीवली यांजकडे माहिती करीता रवाना.

Received
09/05/2016

Scanned by CamScanner